स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

---

**रासेयो/२०२५–२६/१७९** **दि. ३०/०७/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**फक्त पुणे व पिंपरी–चिंचवड शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : मा. पंतप्रधान महोदय यांचा 'विकसीत भारतासाठी नशामुक्त युवक' उपक्रमाच्या व्हर्च्युअल संवाद (अभासी संवाद) व प्रतिज्ञा उपक्रमामध्ये व पथनाट्य स्पर्धेमध्ये सहभागी होणेबाबत...**

महोदय/महोदया,

मा. क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, क्षेत्रीय संचलनालय, महाराष्ट्र व गोवा विभाग, भारत सरकार, शिवाजी नगर, पुणे यांनी पाठविलेल्या ईमेलनुसार व युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संकल्पनेनुसार नशामुक्त युवक उपक्रमांतर्गत दि. २ ऑगस्ट, २०२६ रोजी, मा. पंतप्रधान महोदय यांचा 'विकसीत भारतासाठी नशामुक्त युवक' व्हर्च्युअल संवाद (अभासी संवाद) व प्रतिज्ञा उपक्रम आयोजित करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. सदर उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्रातील प्रमुख ७ ठिकाणी प्रसारीत करण्यात येणार आहे, त्यापैकी एक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरामध्ये आयोजन करण्यात येणार आहे.

सदर उपक्रमामध्ये मा. पंतप्रधान महोदय व्हर्च्युअल संवाद (अभासी संवाद) पद्धतीने सहभागी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहेत व नशामुक्तीपर शपथ देणार आहेत. यानिमित्ताने मा. पंतप्रधान महोदय यांच्या आवाहनानुसार पुणे शहरातील विविध महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांमार्फत 'विकसीत भारतासाठी नशामुक्त युवक' या विषयावर पथनाट्य सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

तरी **'विकसीत भारतासाठी नशामुक्त युवक' या विषयावर पथनाट्य स्पर्धेकरिता करण्याकरिता** आपल्या महाविद्यालयातील पथनाट्य संघ व सोबत २ विद्यार्थी **रविवार, दि. २ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजता, संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे पाठवण्यात यावे. सहभागी विद्यार्थ्यांना युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्यामार्फत सहभाग प्रमाणपत्र वितरीत केले जाईल, तसेच या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय प्राप्त विजेत्यांना अनुक्रमे रू. ५०००/–, रू. ३०००/–, व रू. २०००/– किमतीची पुस्तके देण्यात येतील.

वरीलप्रमाणे उपक्रमांमध्ये सहभागी होण्याकरिता **https://forms.gle/dvarR7u8Bkruf1M2A** या गुगल लिंकद्वारे अनिवार्यपणे नावनोंदणी करणे आवश्यक आहे. सदर उपक्रमाकरिताचा प्रवास खर्च महाविद्यालयाच्या रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

***नावनोंदणी : सकाळी ९.०० वा.***
***अल्पोपाहार : सकाळी ९.३० वा.***
***मा. पंतप्रधान महोदय व्हर्च्युअल संवाद (अभासी संवाद) : सकाळी १०.०० वा.***
***पथनाट्य स्पर्धा : स. ११.०० वा.***
***भोजन : दुपारी १२.३० वा.***

---